नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक २८/०६/२०२४ (शुक्रवार) सायंकाळ

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

## पोलीस स्टेशन मौदा ची कार्यवाही

दिनांक २७/०६/२०२४ रोजी सायंकाळी १८/४५ वा. दरम्यान पोस्टे मौदा येथील स्टाफ पो. स्टे. हद्दीत स्टाफसह अवैध रेती वाहतूकीस आळा घालणेकरिता पेट्रोलिंग करीत असताना भंडारा ते नागपूर NH-53 रोडवर ट्रक क्र. MH-40/BF -1951 हा येताना दिसल्याने बोरगाव शिवारातील बोरगाव बस स्टॉप जवळ नाकाबंदी दरम्यान ट्रक थांबवून पाहणी केली असता १२ चाकी ट्रक क्र. MH-40/BF-1951 मध्ये अंदाजे १० ब्रास रेती मिळून आल्याने सदर ट्रक चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांनी रॉयल्टी नसल्याचे सांगून ट्रक मालकाचे सांगण्यावरून भंडारा येथील रेती घाटातून आणल्याचे सांगितले. सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने ट्रक क्र. MH-40/BF-1951 किं. रु. ३०,००,०००/— व त्यामधील १० ब्रास रेती किं. रु. ५०,०००/— व एक विवो कंपनीचा मोबाईल किंमती १०,०००/— रू असा एकूण रु. ३०,६०,०००/— चा मुद्देमाल जप्त करून ट्रक चालक नामे — १) तुषार अंकुश रेहपाडे वय २८ वर्ष, २) क्लीनर सुधीर रमेश शेंद्रे, वय २८ वर्ष दोन्ही रा. चित्तापूर ता. जि. भंडारा तसेच ट्रक क्र. MH 40/BF 1951 चा मालका विरुद्ध पोस्टे मौदा येथे कलम ३७९, १०९, ३४ भा. द. वी. सहकलम ४८(७), ४८(८) महा. ज. म. स. सहकलम ४, २१, खाणी आणि खनिजे अधी. १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. मौदा येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली मा. उपविभागीय पो. अधिकारी साहेब कामठी विभाग, ठाणेदार पो.नि. सतीशसिंह राजपूत, पो.उपनी महेश बोथले, पोहवा. संदीप कडू, पो. हवा. गणेश मुदमाळी, पो.हवा. रुपेश महादुले, आकेश गाढवे यांनी केलेली आहे.




## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

## पोलीस स्टेशन रामटेक ची कार्यवाही

दिनांक २७/०६/२०२४ चे ०४.१० वा. ते ०६.१० वा. दरम्यान फिर्यादी हे पोस्टे रामटेक हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना मुखबिरव्दारे खबर मिळाली की, पोलिस ठाणे रामटेक हद्दीतील तुमसर ते रामटेक रोड वाहीटोला रामटेक ता. रामटेक येथे ०७ टिप्पर तुमसरकडुन रामटेक नागपूरकडे येत असुन त्यामध्ये अवैधरीत्या विनापरवाना रेतीची टिप्पर व्दारे चोरटी वाहतुक होत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीवरून तुमसर ते रामटेक रोड वाहीटोला रामटेक ता. रामटेक येथे रामटेक पोलिस स्टाफ यांनी नाकाबंदी करून १) १२ चाकी टिप्पर क्र. MH-40/CT-9788 चा चालक आरोपी नामे–१) जावेद मुक्तारजमा हमेदी वय ३६ वर्ष रा. नया बाजार ताज चौक कामठी याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये ८ ब्रास रेती कि ४००००/– रू. २) १० चाकी टिप्पर क्र_MH-36/CT-4632 चा चालक आरोपी नामे– ग्यानिराम चंदनलाल कात्रे वय ३८ वर्ष, रा. बरबसपुर पो. नवेबाव ता. वाराशिवणी जि. बालाघाट (म.प्र) ह. मु. विजय नगर कळमना मार्केटच्या बाजूला नागपूर याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये ६ ब्रास रेती कि ३००००/– रू ३) टिप्पर क्र. MH-40/CT-7717 चा चालक आरोपी नामे– कमरूज जमा अन्सारी वय ४६ वर्ष रा. डॉक्टर शेख बुनकर कॉलनी कामठी याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये ०८ ब्रास रेती ४०,०००/–रू. ४) टिप्पर क्र. MH-40/BF-8688

चा चालक आरोपी नामे—४) तौसिफ फयाज अन्सारी वय २७ वर्ष रा. येरखेडा भुपन नगर कामठी याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १२ ब्रास रेती किंमती ६००००/—रू. ५) टिप्पर क्र. MH-49/BZ-2152 चा चालक आरोपी नामे— आफताब मोहम्मद हबिब अहमद, वय ३५ वर्ष रा. स्माईलपुरा कामठी याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १२ ब्रास रेती कि ६००००/— रू. ६) टिप्पर क्र. MH-40/CS-6600 चा चालक आरोपी नामे— देविदास नारायण मसराम वय ३९ वर्ष रा. आझाद नगर तारीनी शाळेजवळ गिट्टीखदान नागपूर याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये ०८ ब्रास रेती ४०,०००/—रू. ७) टिप्पर क्र. MH-31/FC-7500 चा चालक आरोपी नामे— संतोष टेकराम पंधरे, वय ४८ वर्ष रा. शादीकवाद कॉलनी गंगानगर मानकापूर नागपूर याने आपल्या ताब्यातील वाहनामध्ये १२ ब्रास रेती किंमती ६०,०००/—रू. असे एकुण आरोपी क्र. १ ते ७ यांनी आपल्या मालक नामे— गणेश महादेव शाहू, जगदीश नगर वाडी रोड नागपूर याचे सांगण्यावरून त्यांच्या ताब्यातील टिप्पर वाहनामध्ये एकुण ६६ ब्रास रेती अवैधरित्या वाहतुक करीत असतांना मिळुण आल्याने त्यांच्याकडुन १) **१२ चाकी टिप्पर क्र. MH-40/CT-9788** किंमती २०,००,०००/—रू. २) १० चाकी टिप्पर क्र MH-36/CT-4632 किंमती १५,००,०००/—रू. ३) टिप्पर क्र. MH-40/CT-7717 किंमती २००००००/— रू. ४) टिप्पर क्र. MH-40/BF-8688 किंमती ३००००००/— रू. ५) टिप्पर क्र. MH-49/BZ-2152 किंमती ३००००००/— रू ६) टिप्पर क्र. MH-40/CS-6600 किंमती २००००००/— रू ७) टिप्पर क्र. MH-31/FC-7500 किंमती ३०,००,०००/— रू एकुण ६६ ब्रास रेती किंमती ३३००००/— रू. व ७ टिप्पर वाहन १६५००००००/—रू असा एकुण १,६८,३०,०००/— रू चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पो.स्टे. रामटेक येथे आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा.द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे रामटेक येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल यांचे नेतृत्वाखाली त्यांचा स्टाफ यांनी केली.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**